*Janardan Bhagat Shikshan Prasarak Sanstha's*
*C. K. THAKUR VIDYALAYA, NEW PANVEL*
**ENGLISH MEDIUM -SECONDARY SECTION**
**Plot: 8, Sector: 14, Janardan Bhagat Marg CIDCO Colony, New Panvel, TN: 27463729, E-mail: ckteshm@gmail.com**
School Code / Index: (1) HSE & NTSE: **1403039**; (2) U-DISE: **27240818843**; (3) SSC: **17.01.017**

**दि.15.08.2025**

# ‘‘सी के टी संकुलात ७९ वा स्वातंत्र्यदिन उत्साहात साजरा’’

सी के टी संकुल नवीन पनवेल येथे भारताचा ७९ वा स्वातंत्र दिन सोहळा मोठ्या उत्साहात पार पडला. जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेचे वाईस चेअरमन मा. श्री वाय. टी देशमुख यांच्या शुभहस्ते ध्वजारोहण करण्यात आले.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक इंग्रजी माध्यमिक विभागाचे मुख्याध्यापक माननीय श्री संतोष चव्हाण सर यांनी केले. त्यांनी आपल्या प्रास्ताविकात आपल्या देशाच्या स्वातंत्र लढ्याविषयी, त्यागाविषयी सध्याच्या प्रगतीविषयी मनोगत व्यक्त करून आपल्याला आजही अनेक आवाहनांवर मात करायची आहे निरक्षरता, दारिद्र्य, प्रदूषण आणि असमानता या समस्यांचे निराकरण करून आपल्याला एक समृध्द आणि शक्तीशाली भारत घडवयचा आहे असा संदेश दिला. १३, १४ व १५ ऑगस्ट या तिन्ही दिवशी सिकेटी संकुलात ध्वजवंदन उत्साहात केले गेले असे त्यांनी नमूद केले.

जेबीएसपी संस्थेचे उपकार्याध्यक्ष माननीय श्री वाय टी देशमुख साहेब यांनी आपल्या भाषणात सीकेटीतील एन.सी.सी कॅडेट्स ने केलेल्या शिस्तबद्ध संचलनाचे कौतुक करून विद्यार्थ्यांना आपल्या देशाच्या प्रगतीसाठी सर्वांनी प्रयत्न केले पाहिजे, सर्वांनी शिस्त स्वत: आधी पाळली पाहिजे. शिस्तीने वागले पाहिजे तर आणि तरच आपला देश पुढे जाईल असे नमूद केले. तसेच आपला देश आर्थिक स्थितीत जगात तिसऱ्या क्रमांकावर आहे. भारत इतर देशांना मनुष्यबळ पुरवतो. त्यामुळे आपण जर शिस्त बाणवली, शिस्त असेल, तर आपण आपल्या देशाचे नाव जगाच्या नकाशा वर नक्कीच कोरू असा संदेश आपल्या भाषणातून त्यांनी विद्यार्थ्यांना दिला.

७९ व्या स्वातत्र्य दिनाच्या कार्यक्रमासाठी आज विद्यालयात विविध रंगारंगी कार्यक्रम सादर करण्यात आले यामध्ये इंग्रजी पूर्व प्राथमिकच्या विद्यार्थ्यांनी अतिशय सुंदर अशा वेशभूषा सादर केल्या. तसेच मराठी पूर्व प्राथमिकच्या विद्यार्थ्यांनी देखील सुंदर अशा वेशभूषा सादर केल्या. इंग्रजी प्राथमिक व माध्यमिकच्या विद्यार्थ्यांनी उत्कृष्ट देशभक्तीपर गीत गायन केले. मराठी प्राथमिक च्या विद्यार्थ्यांनी देखील वेशभूषा सादर केली. इंग्रजी माध्यमिकचा विद्यार्थी शुंभकर पाटकर याने देशभक्तीपर भाषण सादर केले, मराठी माध्यमिक च्या विद्यार्थ्यांनी देशभक्तीपर समूह गान सादर केले तर उच्च माध्यमिक च्या विद्यार्थिनींनी अतिशय सुंदर असे देशभक्तीपर नृत्य सादर केले.

यावेळी मा. श्री हरचंद सिंग सग्गु, मा. श्री जयराम मुंबईकर, मा. श्री. जगदिश घरत, मा. श्री संजय म्हात्रे, मा. श्री. संजय पाटील आणि मा. श्री. प्रदिप ठाकूर तसेच सर्व पदाधिकारी, सर्व विभाग प्रमुख, विद्यार्थी, पालक आणि परिसरातील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. संपूर्ण कार्यक्रमाचे उत्कृष्ट सूत्रसंचालन जुनियर कॉलेजच्या शिक्षीका अर्पणा मुकणे यांनी केले.